Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

११/२०२४

**विषय - ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमास शिक्षण शुल्कामध्ये (Tution Fee) एकत्रित १०% सवलत**

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षक केंद्रामार्फत ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ (फेब्रुवारी २०२४ सेशन) चे प्रवेश अर्ज दि.२६/०२/२०२४ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

विद्यापीठातील अधिकार मंडळाने सदर अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या विद्यापीठातील आजी/माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य तसेच शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, तसेच विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यापीठ व महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना यातील एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षण शुल्कामध्ये (Tution Fee) एकत्रित १०% सवलत देणेस मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व संबधितांनी सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेवून सवलतीचा लाभ घ्यावा. सदर अभ्यासक्रमाच्या सूचना व सविस्तर माहितीचा तपशील विद्यापीठाच्या https://online.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

( डॉ. व्ही. एन. शिंदे )
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/**404
**दि.** 07 MAR 2024

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, संचालक, यांचे कार्यालयास.
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक
३) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक
४) जनसंपर्क कार्यालय - प्रसिध्दीसाठी
५) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.**